**वि.दि.मु.क्र.३१७/२०१९**

**निशाणी ५५**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.२–**

मी शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – **अनिल चनाप्पा बोरकडे**

वय – ४० वर्षे

व्यवसाय – शाखा प्रबंधक
स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा दक्षिण
शिवाजीनगर, सांगली.

**वादीतर्फे विधीज्ञ श्री. एम. एच. ग्रामोपाध्ये यांच्यामार्फत सरतपास सुरु**

प्रस्तुत प्रकरणातील साक्षीसमन्स मला मिळाले आहे. साक्षी समन्समध्ये नमुद केल्याप्रमाणे मी आज रोजी कागदपत्रे सोबत आणली आहेत. खातेउतारा सह प्रमाणपत्र, धनादेशाची अनादरीत झालेबाबतची कागदपत्रे आणि धनादेश पुस्तिका खातेदारास पुरविणेत आलेबाबतची कागदपत्रे मी प्रकरणात दाखल केली आहेत. सदरील कागदपत्रे प्रतिवादीच्या खात्याबाबतची असून त्यांचा बचत खाते क्र. ३०४७९७७४३६३ असा आहे. सदरचा खातेउतारा हा दिनांक ०१/०२/२०१७ ते ३०/०४/२०१७ या कालावधीतील आहे. त्यातील मजकूर मूळ खातेउताऱ्याप्रमाणे बरोबर आहे. त्यावर माझी स्वाक्षरी व बँकेचा शिक्का आहे. त्यासोबत भारतीय साक्ष अधिनियमचे कलम ६५ब प्रमाणे प्रमाणपत्र जोडले आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. खातेउताऱ्यास प्रमाणपत्रासह **निशाणी क्रमांक ५६** देण्यात येते.

२. प्रतिवादीस धनादेश पुस्तिका दिल्याबाबतच्या नोंदवहीची प्रत मी प्रकरणात दाखल केली आहे. आजअखेर प्रतिवादीस ६ धनादेश पुस्तिका पुरविण्यात आलेल्या आहेत. आत्तापर्यंत त्यापैकी एकूण ८ धनादेश अनादरीत झालेले आहेत. त्यांचा क्रमांक ८६८५३६, ८६८५३१, ८६८५३२, ८६८५३३, ८६८५३४,

८६८५३५ असा आहे. त्या उताऱ्यावर माझी स्वाक्षरी व बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्रमांक ५७** देण्यात येते. सदरील बचत खाते आज देखील वापरात आहे. त्या खात्याचे संपुर्ण व्यवहाराच्या नोंदी बँकेकडे संरक्षित आहेत.

**<u>उलटतपास प्रतिवादीचे विधीज्ञ एस. आर. पाटील यांचेमार्फत सुरु</u>**

मी सांगली येथील शाखेत मागील एक वर्षापासून कार्यरत आहे. प्रतिवादी हे कर सल्लागार असल्याबाबत मला माहिती नाही. कर सल्लागारांच्या खात्यावर कोणाही खातेदाराचे पैसे जमा होवू शकतात. खात्यावर जमा होणारी रक्कम कशासाठी जमा झाली याबाबतचा उल्लेख खातेउताऱ्यात नसतो. प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादीचे खाते वैयक्तिक बचत खाते आहे. खातेउताऱ्यात जमा रक्कम कशासाठी जमा झाली आहे याचा उल्लेख नसतो. खातेदाराच्या खात्यात जो काही व्यवहार झाल्याबाबतच्या नोंदी असतात त्याबाबतची माहिती खातेदारास असते. प्रस्तुत प्रकरणात मी बँकर्स बुक इव्हीडंन्स ॲक्ट प्रमाणे आवश्यक असणारे प्रमाणपत्र जोडलेले नाही. प्रतिवादीच्या खात्यावर झालेले व्यवहार मी खातेउतारा बघून सांगू शकतो.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

**समक्ष**

Digitally signed by RAJESH PANDURANGRAO KULKARNI
Date: 2025.04.04 13:34:30 +0530

**(राजेश पां. कुलकर्णी)**

**सांगली.**

**दिनांक– ०४/०४/२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.**